साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०१ एप्रिल २०२४ * पाने-४ *₹ २/- www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## ग्राहक, ठेवीदारांच्या संयमाचा बांध तुटत चालला...

# पतसंस्थेच्या शाखांना कुलूप लाऊन पळून जाणे हा पर्याय नाही !

**परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- ज्यादा व्याजाचे अमिष दाखऊन ठेवीदार व ग्राहकांचा विश्वास संपादन करत जमवलेल्या पैशाचा दुरूपयोग केल्यानंतर स्वतःच्या सुरक्षीततेसाठी संस्थांच्या शाखांना कुलूप लाऊन पळून जाणे हा पर्याय नाही. आता ग्राहक ठेवीदारांच्या संयमाचा बांध तुटत चालला आहे. त्यांच्या असंतोषाचा उद्रेक होण्याअगोदर पैशाची व्यवस्था करणे, संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांपुढे मोठे आव्हान आहे.**



**भाग-२**

राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात सहभाग घेऊन, कार्यक्रमांचे आयोजन करुन समाजात आपले 'वजन' वाढविणे. पतसंस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविणे. यातून ग्राहक ठेवीदारांचा विश्वास संपादन करणे, लोकप्रियता वाढविण्यासाठी मागेल त्याला विनाविलंब कर्जही देणे. ज्यांची कोणतीच पत आणि कुवत नाही अशांना लाखोचे कर्ज देणे, कर्ज देताना वा संस्थेतील आर्थिक व्यवहार करताना संचालक मंडळाची मंजुरी न घेणे, आपले तसेच संस्थेचे संचालक, कर्मचारी, त्यांचे मित्र नातेवाईक आदींना कितीही कर्ज वाटत सुटणे, यातून संस्थेची लोकप्रियता वाढवणे, खैरात वाटल्याप्रमाणे या दिलेल्या कर्जाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करणे, नको त्यांना कर्ज दिल्यामुळे त्यांचीही कर्ज वसुली होत नसल्याने संस्थेला अडचणीत आणणे, संस्थेच्या बाबतीत असलेल्या सहकार खात्याचे नियम धाब्यावर बसवून मनमानी कारभार करणे, दुसऱ्याच्या नावे स्वतः कर्ज उचलणे, असे प्रकार, गैरव्यवहार व घोटाळ्यात अडकलेल्या पतसंस्थेच्या बाबतीत झाले आहेत. अनेक ठिकाणी एका मागून एक शाखा उघडणे, तिथे फर्नीचर, संगणक, सुटाबुटातील कर्मचारी असा थाटमाट करणे, सुरूवातीला कर्ज वाटणे, पुढे ठेवी गोळा करणे, शिवाय आर.डी, बचत, करंट खाते यासारखे बँक खाते उघडणे, पिग्मी गोळा करणे, त्यावर आकर्षक व्याज देणे यातून मोठ्या प्रमाणात निधी संकलित करणे, कर्जावर मनमानी व्याज लावणे, कर्ज देताना विविध नावाने कर्जाच्या रक्कमेतून कपात करणे असे प्रकारही अनेक संस्थेतून झाले आहेत.

ठेवी गोळा करण्यासाठी विविध वर्तमानपत्रात, टी.व्ही. चॅनलवर मोठमोठ्या जाहिराती देऊन व या जाहिरातीत ज्यादा व्याज दराचे अमिष दाखऊन, ठेवीवर पूर्ण विमा संरक्षण असल्याचे सांगून राज्य व देशभरातून या संस्थांनी ठेवी गोळा केल्या आहेत. या जाहिरातीला बळी पडून अनेकांना आता असे वाटते आहे की, आपली फसवणूक झाली आहे.

संस्थेच्या शाखांवर नियंत्रण नसल्याने गैरव्यवहार वाढत गेले. संस्थेच्या खेळत्या भांडवलातून पदाधिकाऱ्यांनी कितीही रक्कमा घेतल्याचे दिसते आहे. संस्थेकडे जमा झालेला सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशाचा असा दुरूपयोग गैरव्यवहार व घोटाळ्यात अडकलेल्या संस्थेकडून झाला आहे. या प्रकाराकडे देखरेख ठेवणाऱ्या व्यवस्थेने का दुर्लक्ष केले? लेखा परीक्षणात याबाबी पुढे आल्या नाहीत का? असा सवाल आता उपस्थित होतो आहे.

संस्थेतील घोटाळे व गैरव्यवहार चव्हाट्यावर आल्यानंतर ग्राहक, ठेवीदार व इतर संबंधितांचा विश्वास उडाल्याने ग्राहक, ठेवीदार आपले पैसे काढण्यासाठी संबंधित संस्थेकडे गेल्यानंतर सुरुवातील काही ग्राहकांना पैसे दिलेही गेले. परंतु पुढे-पुढे संबंधित संस्थेतील कर्मचारी पैसे वाटू न शकल्यामुळे एकच गोंधळ उडाला. नंतर आपले पैसे काढून घेण्यासाठी ग्राहक, ठेवीदारांच्या रांगा अशा संस्थांपुढे लागल्या. जवळ पैसाच नसल्याने व ग्राहकांच्या गोंधळामुळे शाखांना कुलूप घालण्याची वेळ परळीसह जिल्ह्यातील अनेक पतसंस्था व मल्टीस्टेट संस्थांवर आली. पैशासाठी ग्राहक, ठेवीदार संस्थाचालकाच्या व संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या घरीही जाऊ लागल्याने घराला कुलूप ठोकून पळून जाण्याशिवाय संबंधितांना पर्याय उरला नाही. घोटाळ्यात अडकलेल्या संस्थेतील अनेक कर्मचारी, पदाधिकारी गेल्या अनेक महिन्यांपासून फरारी आहेत. संस्थांना कुलूप आहे. अनेक दिवसांपासून पदाधिकारी बेपत्ता आहेत. ग्राहक, ठेवीदारांचे पैसे अडकलेले आहेत. असे असतानाही संबंधित सरकारी यंत्रणा डोळे झाकून का गप्प आहे? असा सवाल ग्राहक, ठेवीदार करत आहेत. घोटाळा व गैरव्यवहारात अडकलेल्या संस्थेच्या कारभाराचा परिणाम चांगले काम करणाऱ्या इतर संस्थांवर मोठ्या प्रमाणात झाला आहे. या संस्थांची व त्यांच्या कर्मचारी व पदाधिकाऱ्यांची मधल्या काळात व आताही काही प्रमाणात दमछाक झाली. परंतु या मंडळींनी तारेवरची कसरत करत आपल्या संस्थेच्या कारभाराचा डोलारा मोठ्या प्रयत्नाने सांभाळला.

गैरव्यवहार व घोटाळ्यात अडकलेल्या संस्था कुलूपात बंद ठेवण्यापेक्षा फरारी पदाधिकाऱ्यांनी येथे येऊन संस्था उघडल्या पाहिजेत. स्वतःउचललेल्या कर्जाचा भरणा करुन व वाटप केलेल्या कर्जाची वसुली करुन ग्राहकांना, ठेवीदारांना जमतील तसे पैसे देणे, संस्थेची मालमत्ता विकून किंवा तारण ठेऊन येणाऱ्या पैशातून ग्राहक ठेवीदारांना त्यांचे पैसे देणे हाच पर्याय आता या संस्थांकडे राहिला आहे. पळून जाणे, मोबाईल बंद करुन बसणे, खोटी आश्वासने देणे हा पर्याय नाही. यामुळे ग्राहक, ठेवीदाराचा असंतोष वाढत आहे. त्यांच्या संयमाचा बांध तुटला तर कठीण परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे एकंदरित चित्र आहे.

सध्या कुलपात बंद असलेल्या पतसंस्थांकडून ज्यांनी लाखो रुपयांचे कर्ज उचलले आहे. त्यातील अनेकांना आज असे वाटते आहे की बरे झाले. आपण घेतलेले कर्ज आता भरायची गरज नाही. यामुळे ते खुष आहेत. परंतु त्यांचा हा समज चुकीचा आहे. कर्ज घेतेवेळी सही करुन संस्थेला दिलेले कागदपत्रे, सही करून चेक, इतर दस्तऐवज याद्वारे कर्जधारकांवर केव्हांही कारवाई होऊ शकते. कर्ज न भरल्यास मालमत्ता जप्तीची कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे कर्ज धारकांनी कर्ज भरणे किंवा कर्जाचे थकीत हप्ते भरणे हा त्यांच्यापुढे एकमेव पर्याय आहे. संस्था बंद असली तरी संस्थेचा बँक खाते क्रमांक घेऊन कर्ज भरता येऊ शकते.

दरम्यान, घोटाळे व गैरव्यवहारात अडकलेल्या मल्टीस्टेट व पतसंस्थेच्या ठेवीदारांची परवा बीडला व्यापक बैठक झाली. यावेळी दीड हजारावर ठेवीदार हजर होते. या बैठकीत संबंधित संस्थेच्या कारभारावर, पदाधिकाऱ्यांवर व त्यांच्या खोट्या आश्वासनावर मोठा आक्रोश व्यक्त करण्यात आला. मराठवाड्यात लाखो ठेवीदार आहेत, होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी या ठेवीदारांची मते नको आहेत का? असा सवाल यावेळी उपस्थित झाला. राज्यकर्ते व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देण्याची मागणी केली गेली आहे. ***

## परळीची कन्या सुरभी जगतकर मानसशास्त्र विषयावरील संशोधनासाठी कॅनडाला जाणार



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी येथील भीमनगर मधील सुरभी संजय जगतकर ही मानसशास्त्र विषयावरील संशोधनासाठी कॅनडाला जाणार आहे. तिच्या या निवडीबद्दल शहरातील भीमनगरमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात तिचा सत्कार करण्यात आला.

सुरभी संजय जगतकर हिचा कॅनडा या देशात मानसशास्त्र या विषयावर संशोधन करण्यासाठी निवड झाली असून तिच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारावी, जेणेकरून तिला प्रोत्साहन मिळेल हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था भीम नगर परळी व साप्ताहिक मानपत्र परळीच्या वतीने सकाळी ठीक दहा वाजता परळी शहरातील भीमनगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृहात तिचा शाल श्रीफळ पेन व पाच हजार रुपयाच बक्षीस देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सुरभी संजय जगतकर हिची निवड झाल्याबद्दल सर्वत्र तिचे कौतुक होत आहे. ***

## स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेला ७४ लाख ९ हजार निव्वळ नफा-बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ (बातमीदार):- शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकींग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख कायम ठेवत पतसंस्थेने गेल्या आर्थिक वर्षात मार्च २०२४ अखेर उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. ७४ लाख ९ हजार निव्वळ नफा झाला.

सरत्या आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. विशेष म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी- ३८कोटी २५ लाख,कर्ज ३१ कोटी ७२ लाख, गुंतवणूक १३कोटी ३२लाख, आर्थिक उलाढाल १३०कोटी ९३लाख, राखीव निधी ५ कोटी ७१लाख, भाग भांडवल- ६९लाख ९७ हजार, खेळते भांडवल- ४८कोटी ९७ लाख, निव्वळ नफा ७४लाख ९ हजार इतका आहे. पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. यापुढेही हा विश्वास सार्थ ठरवून वाटचाल करु अशी ग्वाही पतसंस्थेचे अध्यक्ष बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी, उपाध्यक्ष अनिल आष्टेकर, सचिव जितेंद्र नव्हाडे, कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे, राजाभाऊ मराठे, रवि मुळे, दशरथ होळकर, डॉ.सौ.श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांच्यासह संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी आदींनी केले आहे. **



बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !

## 'जलयुक्त' चा अहवाल सादर करण्याचे आदेश
## उपलोकायुक्तांच्या सुनावणीला अधिकाऱ्यांची दांडी

पुणे (बातमीदार):- जलयुक्त शिवार अभियानातील मृद् व जलसंधारणाच्या कामांच्या तपासणीतील कथित गैरव्यवहार प्रकरणी आठवडाभरात अहवाल सादर करा असे आदेश राज्याच्या उपलोकायुक्तांनी दिले आहेत.

बीड जिल्ह्यात झालेल्या जलयुक्त शिवारातील गैरव्यवहार प्रकरणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत मुंडे यांनी उपलोकायुक्तांकडे तक्रार दाखल केलेली आहे. या प्रकरणाची सुनावणी उपलोकायुक्त संजय भाटिया यांनी मंगळवारी (ता.१९) घेतली. मात्र सुनावणीस केवळ श्री.मुंडे व दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषी आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम प्रत्यक्ष हजर होते. बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुंडे, जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अनुपस्थित होते. त्यावर श्री मुंडे यांनी तीव्र हरकत घेतली. केवळ राजकीय हस्तक्षेपामुळे जलयुक्त शिवार अभियानातील गैरव्यवहाराची चौकशी रखडविण्यात आली आहे. ३० ठेकेदारांवर गुन्हे दाखल करू नका म्हणून दबाव आणला जात असल्याचे पुरावेच श्री. मुंडे यांनी सादर केले. तसेच, या प्रकरणात दोषींच्या मालमत्तांवर बोजा चढविण्याचे आदेश झालेले आहेत. ठेकेदारांवर गुन्हे दाखल करून अटकेचेही आदेश दिले गेले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी केवळ राजकीय हस्तक्षेपामुळे होत नाही. त्यामुळे उपलोकायुक्तांनीच आता कारवाईचा अहवाल मागवून घ्यावा, असा युक्तिवाद यावेळी करण्यात आला. उपलोकायुक्तांनी ही मागणी मान्य करीत कारवाई अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी कृषी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या विरोधात दोन तर ठेकेदारांच्या विरोधात एक असे एकूण तीन गुन्हे दाखल केले आहेत. २० जणांना अटक केलेली असून गैरव्यवहाराची काही रक्कम वसूल करण्यात आली आहे. परंतु अन्य तीन अधिकाऱ्यांच्या जवळील एक कोटीच्या आसपास वसुली केलेली गेलेली नाही. या अधिकाऱ्यांचा शोध लागत नसल्याचा युक्तिवाद पोलिसांनी यापूर्वीच्या सुनावणीत केला होता.

दरम्यान, जलयुक्त शिवार अभियानातील चौकशीत उच्चपातळीवर लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप होतो आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरण आता लोकायुक्तांकडे वर्ग करावे, अशी मागणी करण्यात आली होती. ती स्वीकारण्यात आली आहे, असे वसंत मुंडे यांनी सुनवणीनंतर स्पष्ट केले. ***

## वाणीसंगमच्या गोदावरी गंगेत सापडलेल्या मूर्तीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

सोनपेठ (बातमीदार):- शहरापासून जवळ असलेल्या जुने वाणी संगम येथील गोदावरी नदीतील गाळात गुरूवारी एक मूर्ती सापडली होती. या मूर्तीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे.



गावातील सोमनाथ काळे व भगवान मस्के पाटील हे दररोज जुने वाणीसंगमच्या गोदावरी नदीजवळील श्री वाघेश्वर मंदिरात दर्शनास जातात. गुरुवारी सकाळी ६.३० वाजता सोमनाथ काळे व भगवान मस्के हे खाली गोदावरी नदीच्या काठी गेले होते. यावेळी नदीत गाळात रुतून बसलेली मूर्ती सोमनाथ काळे यांना दिसली. त्यांनी भगवान मस्के यांना सूचना करून वर असलेल्या इतर सोबत्यांना फोनद्वारे संपर्क साधून ही बाब सांगितली याप्रसंगी नारायण मस्के पाटील, माराती रंजवे, लक्ष्मीकांत कादे, माणिक अघाव, गंगाधर मस्के व सोमेश्वर नगरवासीयांनी गाळात रुतूनबसलेली मूर्ती प्रयत्नांची पराकाष्ठा करत बाहेर काढून विधिवत पूजा करुन पुष्पहार अर्पण करुन श्री वाघेश्वर मंदिराशेजारी आणून स्थापना केली. वाणीसंगम येथील गोदावरी गंगेत गाळात मूर्ती आढळल्याची माहिती मिळताच मूर्तीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे. **

## अंबाजोगाईला ७ एप्रिल रोजी मराठवाडा विभागीय गझल संमेलन

अंबाजोगाई, (बातमीदार):- गझल मंथन साहित्य संस्था आणि बीड जिल्हा कार्यकारिणीतर्फे अंबाजोगाई (जि. बीड) येथे दि. ७ एप्रिल रोजी मराठवाडा विभागीय एक दिवसीय गझल संमेलन आयोजित केले आहे. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ गझलकार डॉ. शेख इक्बाल मिन्ने यांची निवड करण्यात आली आहे. स्वागताध्यक्ष जेष्ठ गझलकार डॉ. संतोष कुलकर्णी असून उद्घाटक म्हणून जेष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे उपस्थित राहतील.

संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ गझलकार दास पाटील आणि शिवदादा डोईफोडे उपस्थित राहणार आहेत. नवोदित गझलकारांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी गझल मंथन साहित्य संस्थेतर्फे विभागीय स्तरावर एक दिवसीय गझल संमेलन आयोजित केले जात आहे. या संमेलनात होणाऱ्या मुशायऱ्याचे अध्यक्षपद गझलकार रत्नाकर जोशी, डॉ. राज रणधीर, मुकुंद राजपंखे, शेखर गिरी, मारुती मानेमोड,आत्तम गेंदे भूषविणार आहेत. तर सूत्रसंचालन गझलकार दिवाकर जोशी, आर. के. आठवले, चंद्रकांत कदम, आत्माराम जाधव, बापू दासरी, अविनाश कासंडे करतील. या संमेलनात बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, जालना, हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गझलकार सहभागी होणार आहेत. सहभागी गझलकारांना आकर्षक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल. प्रास्ताविक अनंत देशपांडे करतील. मुख्य सूत्रसंचालन निशा चौसाळकर करतील. तर संजय तिडके आभार मानतील. हे संमेलन ७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत नागापूरकर सभागृह, योगेश्वरी महाविद्यालय परिसर, अंबाजोगाई, जि. बीड येथे होणार आहे. या संमेलनाचा गझल रसिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे तसेच बीड जिल्हा कार्यकारिणी व मराठवाडा विभागीय कार्यकारिणीतर्फे करण्यात आले आहे. ***

### राष्ट्रवादीच्या प्रवेशानंतर फुलचंद कराड यांचे परळीत जल्लोषात स्वागत

# बीड जिल्ह्यात शरदचंद्र पवार यांची ताकद दाखऊन देऊ-फुलचंद कराड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- भाजपा जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) मध्ये मुंबई येथे प्रवेश केल्यानंतर परळी शहरात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व समर्थकांनी जल्लोषात स्वागत केले.यानंतर छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत प्रभू वैद्यनाथाचे दर्शन,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन व दर्ग्यावर चादर चढवल्यानंतर बोलताना सांगितले की,या लोकसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची बीड जिल्ह्यातील ताकद दाखवुन देवु असे सांगितले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेशानंतर जेष्ठ नेते फुलचंद कराड हे परळी शहरात प्रथमच दाखल झाल्यानंतर शनिवार दि.३० मार्च रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कराड समर्थकांनी जल्लोषात स्वागत केले.छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत वंदन केले तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व बसस्थानक परिसरातील लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.यावेळी फुलचंद कराड तुम आगे बढो,शरदचंद्र पवारसाहेब जिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. यानंतर बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या पाचवे ज्योतिर्लिंग प्रभु वैद्यनाथाचा अभिषेक केला व नंतर हजरत उमरशाह वली दर्गाह येथे चादर अर्पण केली.यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना फुलचंद कराड म्हणाले की,मला भाजपात काम करु दिले जात नव्हते,मागील दहा वर्षात मला साधे महामंडळही मिळु दिले नाही उलट पक्षाचे पद काढुन कुचंबणा केली.यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार या पक्षात आपल्या समर्थकांसह जाहिर प्रवेश केला.या लोकसभा निवडणुकीत शरद पवार हे बीड लोकसभेसाठी जो उमेदवार देतील तो निवडुन आणत बीड जिल्ह्यात शरद पवार साहेबांची ताकद दाखवुन देवु असे सांगितले.फुलचंद कराड यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख,रमेश ढाकणे,कुरेशी मेहबूब,माऊली फड, रवी कराड,गोविंद मुंडे,विश्वनाथ मुंडे, इंद्रमोहन मुंडे,विजय बडे,प्रशांत कराड,मंचक मुंडे,वैजनाथ राठोड,प्रकाश राठोड,बाळासाहेब कराड,रमेश चव्हाण,वैजनाथ कराड, सोपान कराड,भागवत नागरगोजे, राम कराड,बबन जाधव,गणेश मुंडे, विकास राठोड,संदीप कराड आदी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. ***

## एमपीएससीतील यशाबद्दल श्री.व सौ.सटाले यांचा तडोळी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- तालुक्यातील तडोळी येथील प्रमोद भास्करराव सटाले यांची राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने शासकीय सेवेत वित्त व लेखा अधिकारी वर्ग १ या पदावर निवड झाली तर त्यांच्या पत्नी स्मिता प्रमोद सटाले यांची वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झाली आहे.




तडोळी येथे गावकऱ्यांच्या वतीने नुकताच गावातून मिरवणूक काढून त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे, चंद्रकांत देवकते, ॲड.विष्णुपंत सोळंके, ॲड.अजय बुरांडे, माणिकराव सातभाई, सरपंच अशोकराव डिघोळे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

तडोळी गावचे भास्करराव सटाले यांची प्रमोद, विनोद व शरद हे तीन मुलगे आहेत. प्रमोद हे राज्य विक्रीकर निरीक्षक म्हणून नगर येथे तर विनोद हे परळी येथे वकीली करतात व शरद हे पुणे येथे एमपीएससीची तयारी करीत आहेत. प्रमोद सटाले यांनी २०१५ मध्ये सांगली येथे वित्त विभागात ज्युनिअर ऑडिटर म्हणून काही महिने काम केले आहे, २०१६ पासून राज्य विक्रीकर अधिकारी म्हणून कार्यरत असतानाच प्रमोद सटाले यांनी एमपीएससीचा अभ्यास करून हे यश मिळविले आहे. २०२३ मध्ये दिलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे. त्यात ते उत्तीर्ण झाले आहेत तर त्यांच्या पत्नी स्मिता सटाले श्रीगोंदा येथे कर व निर्धारण अधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांनीही एमपीएससीच्या परीक्षा देवून तालुका वनअधिकारी म्हणून आता नियुक्ती मिळविली आहे. त्या आता उत्तराखंडमध्ये फॉरेस्ट विभागाचे प्रशिक्षण घेत आहेत. पती क्लास वन तर पत्नी क्लास टू अधिकारी होवून तडोळी गावचे नाव लौकीक केले आहे. प्रमोद सटाले यांचे प्राथमिक शिक्षण तडोळी येथे व मांडेखेल येथील आसुबाई विद्यालयात झाले. पुढील शिक्षण त्यांनी लातूर येथून घेतले व शासकीय सेवेत २०१५ मध्ये रूजू झाले आहेत. तडोळी गाव हे खडकाळ भागात असून येथे शेतीचे उत्पन्न म्हणावे तसे नाही अशा परिस्थितीत आपल्या वडिलांनी आम्हा भावंडांना शिकविले व पाच एक्कर जमीन विकली. त्यामुळे आम्ही शिक्षण घेवून यशस्वी झालो, सामान्य परिस्थिती असल्याने अभ्यासाशिवाय पर्याय नव्हता म्हणून आपण उच्च अधिकारी होण्याचे ठरविले, ओपन कॅटेगॅरीतून यश मिळण्याचा आपल्याला आनंद आहे असेही प्रमोद सटाले यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही विचार मांडले. ***

## 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी नागरिकांना आवाहन; स्वतंत्र क्रमांक जाहीर

बीड, (जिमाका):- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कालावधीमध्ये ३९ बीड मतदारसंघातील 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी ८७८८९९८४९९ हा स्वतंत्र क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी यावर फेक न्युज ची माहिती व्हॉट्सअप करावी. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता लागू झाली आहे. याकाळात उमेदवारांचे प्रचारा दरम्यान बदनामी करणे, अफवा पसरविणे, द्वेषपुर्ण संदेश, खोटे संदेश तसेच प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडियाद्वारे प्रसारित होणाऱ्या फेकन्युजची माहिती नागरिकांकडून मिळण्यासाठी हा ८७८८९९८४९९ स्वतंत्र मोबाईल क्रमांक माध्यम प्रमाणिकरण व संनियत्रन समिती आणि मिडिया कक्षाकडून जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर व्हॉट्सअप करावे. ८७८८९९८४९९ या क्रमांकावर नागरिकांकडून मिळालेल्या माहितीची नियंत्रण कक्षाकडून तसेच बीड सायबर पोलीस यांच्या मदतीने शहानिशा करुन आवश्यक कारवाई करावी करण्यात येईल. ***

संपादकीय...

# जीव देऊ नका हो...!

**−० सुविचार ०−**
दुर्लक्ष करण्याचं कौशल्य वाढवणं म्हणजे सुख!

आपल्याकडे पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी असे बोलले जायचे. तसे त्याकाळी होते ही! पाऊसकाळ चांगला व वेळेवर होता. त्यामुळे सर्वत्र संपन्नता होती. शेत शिवार चांगले पिकल्याने व्यापारही चांगला चालायचा. या दोन्ही गोष्टीमुळे नोकरी करणे हे कनिष्ठच समजले जायचे. आता चित्र उलटे झाले आहे. पूर्वी सारखा पाऊसकाळ राहिला नाही. तो वेळेवर पडत नाही. हिवाळा, उन्हाळ्यात बरसत आहे. उन्ह वाढल्याने तापमान वाढत चालले आहे. हिवाळा कमी झाला आहे. एकूणच ऋतूचे चक्रच बदलले आहे. त्याचा शेती, शेतीतील पीक-पाणी, पर्यावरण याला मोठा फटका बसला आहे. यातून शेती व शेतकरी उध्वस्त होत चालला आहे. त्यातच अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेतकरी आपल्या शेतात जेव्हा पीक पिकवतो व पिकलेले पीक बाजारात आणतो तेंव्हा शेतमालाला भाव नसतो. पिकाचा उत्पादन खर्चही निघत नाही. अनेकवेळा शेतमाल फेकून किंवा बेभाव विकावा लागतो. या प्रकारामुळे शेतकरी आपल्या शेती व शेतीच्या उत्पादनाबाबत दिवसेंदिवस उदासीन होत चालला आहे. नापिकी, रोगराई, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, कर्जबाजारीपणा, शेतमालाला नसलेला भाव यामुळे येणाऱ्या नैराश्येतून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल शेतकरी टाकतो आहे. दिवसेंदिवस या आत्महत्या वाढतच चालल्या आहेत. यामुळे समाजात चिंता वाढतच चालली आहे.

गेल्या वर्षात म्हणजे २०२३ ला आपल्या एकट्या मराठवाड्यात एक हजार ८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यात सर्वाधिक प्रमाण आपल्या बीड जिल्ह्याचे आहे. या वर्षात बीड जिल्ह्यात २६९ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे. त्या खालोखाल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८२ शेतकऱ्यांनी वर्षभरात आत्महत्या केल्या आहेत. सर्वात कमी आत्महत्या हिंगोली जिल्ह्यात घडल्या आहेत. या जिल्ह्यात वर्षभरात केवळ ४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. एकूण आकडेवारी पहाता मराठवाड्यात महिन्याला सरासरी नव्वद तर दररोज तीन शेतकरी आपला जीव देत आहेत. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण दरवर्षी वाढतच चालले आहे. उपलब्ध असलेल्या मागच्या चार वर्षातील आकडेवारीवरुन हे लक्षात येते की गेल्या चार वर्षात सर्वात जास्त आत्महत्या गेल्या वर्षी झाल्या आहेत. मराठवाड्यात २०२० ला ७७३, २०२१ ला ८८७, २०२२ ला १०२२ व २०२३ ला १०८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्येचा चढता आलेख पहाता मोठी चिंता वाढली आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत, म्हणून शासन आपल्या स्तरावर प्रयत्न करत असले तरी त्यास अपयश येत आहे. शेतकरी आत्महत्या करतात का? त्यांच्या अडचणी काय आहेत, याच्या मुळाशी जाऊन ठोस उपाययोजना केल्या तर हे प्रमाण कमी होईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत मोठी ओरड होते. राजकारण केले जाते परंतु ठोस उपाययोजनेकडे मात्र दुर्लक्ष होते. शेतकरी कसे वाचतील यावर शासन पातळीवर आता गंभीर विचार होऊन ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे.

सरलेल्या पावसाळ्यात पुरेसा पाऊस न झाल्याने मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता मोठी आहे. विहिरी, बोर आटले आहेत. शेतमळ्यातील बागायती पिके जपण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांपुढे आहे. शेत शिवारातील पाणी संपल्याने अनेक शेतकरी हवालदील झाले आहेत. या प्रकारातून आपल्या जिल्ह्याच्या शेजारी असलेल्या जालना जिल्ह्यातील अंबड परिसरातील बनटाकळी गावातील अशोक कानकाटे व संगीता कानकाटे या शेतकरी दाम्पत्याने आपल्या शेतातील मोसंबीची बाग पाण्याअभावी सुकल्यामुळे गेल्या आठवड्यात आत्महत्या केल्याच्या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या अशाच आत्महत्या सुरू राहिल्यास शेती आणि शेतकरी उध्वस्त होणार आहेत. शेतीवर संकटे आहेत या संकटावर मात करुन पुढे जाणे गरजचे आहे. आत्महत्येने प्रश्न सुटणार नाहीत, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. ***

# महाराष्ट्राचा मानबिंदू : शिवनेरी

**गडकिल्ल्यांची भ्रमंती हा मराठी माणसाचा केवळ सुटीत वेळ घालवण्यासाठीचा उद्योग नाही, त्याकडे तो पर्यटन म्हणूनही पाहत नाही. गडावर जाणे ही त्याच्यासाठी अभिमानाची बाब असते. शिवछत्रपतींना त्याने केलेले ते वंदन असते. शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे ऐकतच आपण लहानाचे मोठे झालो आहोत. त्यामुळेच त्यांचा पावनस्पर्श झालेल्या कोणत्याही गडावर प्रवेश करताच आपण भूतकाळात शिरतो आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेले किल्ले आपल्यासमोर इतिहास उलगडून ठेवतात. शिवनेरीवर शिवरायांचा जन्म झाला असल्याने त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व गडकिल्ल्यांमध्ये या गडाला आगळेवेगळे स्थान आहे.**

शिवबाचा जन्म १६३० मध्ये झाला अन् त्यांना घेऊन जिजाऊंनी १६३२ मध्ये गड सोडला. १६३७ मध्ये शिवनेरी मुघलांच्या ताब्यात गेला. या घटनांमुळे शिवजन्माच्या वेळेची परिस्थिती समजून घेण्यास अधिक मदत होते. अशा कठीण काळात शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे महत्त्व लक्षात येते. त्यामुळे या किल्ल्यावर शिवाजीराजे केवळ जन्मानंतर दोनच वर्षे राहिले असले तरी त्यांचे जन्मस्थान म्हणून शिवप्रेमींना या किल्ल्याचे प्रचंड महत्त्व वाटते. शिवरायांनी मराठी माणसामध्ये पराक्रमाची ज्योत पेटवली. त्यांनी मराठी मनांमध्ये फुंकलेल्या स्वाभिमानामुळेच आज आपण ताठ मानेने जगत आहोत. त्यामुळेच त्यांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरीला भेट देऊन त्यांना वंदन करणे आपले कर्तव्य आहे.

**थोडक्यात इतिहास:-**
जीर्णनगर अर्थात सध्याचे जुन्नर ही शक राजा नहपान याची राजधानी होती. गौतमीपुत्र सातवाहन सातकर्णीने शकांचा पराभव करून जुन्नर आणि परिसरावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. सातवाहनांच्याच काळातच नाणेघाट खोदला गेला. नाणेघाटातून मोठा व्यापार चालत असल्याने या व्यापारावर देखरेख ठेवण्यासाठी शिवनेरी गडाची निर्मिती करण्यात आली. अर्थात, नाणेघाटाचे रक्षण करणारा हा एकटाच किल्ला नाही. पूर्वेला नारायणगड, उत्तरेला हरिश्चंद्रगड, पश्चिमेला हडसर, चावंड, जीवधन, भैरवगड आणि दक्षिण दिशेला राजमाची, ढाक, गोरक्षगड, मच्छिंद्रगड आणि सिद्धगड असे भक्कम किल्ले चहूबाजूंनी द्वारपालासारखे उभे आहेत. सातवाहनांनंतर चालुक्य, यादव, बहामनी, निजाम यांच्या ताब्यात शिवनेरी होता. १५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्याकडे तो आला. याच गडावर भोसलेंची सून जिजाऊ यांनी १६३० मध्ये शिवबाला जन्म दिला आणि महाराष्ट्राच्या क्षितिजावर नवा सूर्य उगवला. गडावर शिवाई देवीचे देऊळ आहे. याच देवीच्या नावावरून 'शिवाजी' हे नाव ठेवले गेले आहे. जिजाऊ साहेबांनी १६३२ मध्येच हा गड सोडला. नंतर १६३७ मध्ये तो मुघलांच्या ताब्यात गेला. नंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी




अनेक प्रयत्न करूनही तो त्यांच्या हयातीत स्वराज्यात आला नाही. नंतर १७१६ मध्ये शाहू महाराजांनी तो स्वराज्यात आणला. ज्या शिवनेरीवर महाराष्ट्राचा मानबिंदू अवतरला, त्याच शिवनेरीवर शिवजन्मतिथीला २७ एप्रिल १९६० ला वेगळ्या महाराष्ट्र राज्याची घोषणा करण्यात आली होती. शिवाई देवीचे देऊळ : गडावरील शिपाई दरवाजातून आत गेल्यावर शिवाई मंदिर आहे. या मंदिराच्या मागे दगडामध्ये कोरलेल्या सहा ते सात गुंफा आहेत. या गुंफा राहण्यायोग्य नाहीत. देऊळ मूळचे लेणेच आहे. दर्शन घेऊन पुन्हा शिपाई दरवाज्यात या आणि पायऱ्या चढून वर जा, तुम्ही गडाच्या माथ्यावर येता. पुढे तुम्हाला अंबरखाना दिसेल.

**पाण्याचे टाके :-** गडावर गंगा, यमुना नावाने टाक्या आहेत. यामध्ये बारमाही पाणी असते. याशिवाय गडावर लहानमोठी अशी सुमारे पन्नास टाकी आहेत. या टाक्यांमध्ये मुबलक पाणी असते.

**शिवकुंज :-** बालशिवाजी हातात तलवार घेऊन जिजाऊ साहेबांना आपली स्वप्ने सांगत असल्याचे अत्यंत देखणे शिल्प शिवकुंजमध्ये उभारण्यात आले आहे. जवळच रामचंद्रअमात्यांचे आज्ञापत्र आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शिवकुंज'ची पायाभरणी केली होती.

**शिवजन्मस्थान:-** शिवकुंजासमोरच शिवाजी महाराजांचा जन्म झाला ती दुमजली इमारत आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर शिवबाचा जन्म झाला. या इमारतीमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. जन्मस्थानासमोर उजव्या बाजूला कमानवजा मशीद आहे. या मशिदीच्या बाजूलाच किल्ल्याची चोरवाट असून ती तुम्हांला थेट जुन्नरमध्ये नेते. जन्मस्थानापासून उत्तरेला बदामी तलाव आहे. या मानवनिर्मित तलावाला चांगला चौथरा आणि कमान आहे.

ब्रिटिशांनी केलेल्या हल्ल्यानंतर या तळ्यातील झरे बुजले आणि तो कोरडा झाला. तळ्याच्या मागे कैदखाना होता. आता त्याचे अवशेष शिल्लक आहेत.

**साखळीची वाट :-** शिवनेरीवर प्रवेश करण्यासाठीची ही अवघड वाट आहे. उंच चढ चढून जाण्यासाठी साखळ्यांची सोय केली असल्याने याला साखळीची वाट म्हणतात. दगड खोदून तयार केलेली ही पायऱ्यांची वाट आहे.

**अंबरखाना :-** किल्ल्यावर धान्य साठवून ठेवण्यासाठी याचा वापर होत असे. ईस्ट इंडिया कंपनीच्या डॉ. जॉन फ्रायर यांनी या गडाला भेट दिली होती. या गडावर एक हजार माणसांना सात वर्षे पुरेल इतके धान्य साठवून ठेवण्याची सोय आहे, अशी नोंद फ्रायर यांनी करून ठेवली आहे. अंबरखान्याच्या उजव्या हाताला इदगाह आणि कोळी चौथरा आहे. हा गड मुघलांच्या ताब्यात असताना जुन्नर परिसरातील कोळ्यांनी १६५० च्या सुमारास त्यांच्याविरोधात बंड केले होते. मुघलांनी आपल्या पाशवी सामर्थ्याने हे बंड मोडून काढले आणि कोळ्यांना पकडून शिवनेरीवर आणले आणि त्यांची कत्तल केली. जिथे कोळ्यांची मुंडके उडविली, त्या चौथऱ्याला कोळी चौथरा म्हणतात.

**सात दरवाजा:-** शिवनेरीमध्ये प्रवेश करण्यासाठीचा हा सोपा मार्ग आहे. संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत धोरणीपणाने उभारलेले हे सात दरवाजे शिवनेरीचे रक्षण करतात. सुबक पायऱ्यांनी हा मार्ग बनलेला आहे.

**शिवनेरीची रचना:-** गडाचा आकार

(उर्वरित पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०७ * अंक ५० * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०१ एप्रिल २०२४ * किंमत : २ रू.

(पान १ वरुन)....

## महाराष्ट्राचा मानबिंदू : शिवनेरी

बाणाच्या टोकासारखा त्रिकोणी आहे. हे बाणाचे टोक उत्तर दिशेकडे रोखलेले आहे. शिवनेरीवर प्रवेश करण्यासाठी दोन मार्ग आहेत, जरा अवघड वाटणारी साखळीची वाट आणि सोपी असणारी सातवाहनकालीन सात दरवाज्यांची वाट. साखळीची वाट पूर्वी बिकटच होती. आता मात्र मजबूत साखळ्या लावून ती बिनधोक करण्यात आली आहे. हे दोन मार्ग पुरेसे नाहीत म्हणून की काय अडीअडचणीला हाताशी असावी म्हणून एक चोरवाटही आहे. महा दरवाजा, पीर दरवाजा, परवानगी दरवाजा, हत्ती दरवाजा, शिपाई दरवाजा, फाटक दरवाजा आणि कुलाबकर दरवाजा अशी या सात दरवाजांची नावे आहेत. परवानगी दरवाजाच्या दोन्ही बाजूंना शरभाची चित्रे आहेत. शरभ हा वाघ अथवा सिंहासारखा दिसणारा काल्पनिक पशू आहे. या शरभाच्या पायाखाली हत्ती दाखवण्यात आला आहे. येथे गंडभेरुंड या काल्पनिक पक्ष्याचेही चित्र आहे. शिपाई दरवाजाच्या कमानीवरही चित्रे आहेत. शिपाई दरवाजाची तटबंदी हा बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. गडाची मजबुती पाहून त्याला जुन्नरचा रक्षणकर्ता का म्हणतात, ते समजते. या किल्ल्याचा विस्तार साधारणपणे १.६ किमी आहे. गड पाहण्यासाठी दोन ते तीन तास लागतात. शिवनेरी किल्ला बराच काळ दुर्लक्षित राहिला होता. नंतर मात्र १९२५ ला शिवजन्मस्थानाचा जीर्णोद्धार झाला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रस्ता गेला आहे. अजूनही गडावर सुधारणा होत आहेत.

**कडेलोट कडा:-** कैदखान्याच्या मागेच कडेलोट कडा आहे. गुन्हेगारांना शासन करताना या कड्यावरून खाली दरीत ढकलून दिले जात असे. सुमारे दोन हजार फूट उंच असलेल्या या कड्यावर जोरदार वारे असते. त्यामुळे येथे जाताना जपूनच जावे.

**शिवनेरीची वैशिष्ट्ये :-** समुद्रसपाटीपासून उंची : ३५०० फूट तळापासून उंची : १००० फूट पायथ्याचे गाव : जुन्नर

**शिवनेरीच्या जवळील इतर पर्यटनस्थळे :-** अष्टविनायकांमधील एक लेण्याद्री, नारायणगड, खोडद येथील जगप्रसिद्ध दुर्बीण, हरिश्चंद्रगड, ओतूर, ओझरचा विघ्नेश्वर.

**शिवनेरीला कसे याल ?**

**पुण्यापासून**–पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्येच हा किल्ला आहे. पुण्यापासून शिवनेरी १०५ किलोमीटर अंतरावर आहे. एसटीने जुन्नरला येऊन गडावर जाता येते.

**मुंबईपासून**–मुंबई–ठाणे–कल्याण–आळे फाटा मार्गे जुन्नर. कल्याण–नगर रस्त्यावरील माळशेज घाट पार केल्यावर साधारण आठ किलोमीटरनंतर शिवनेरीकडे जाणारा फाटा लागतो. तेथून गड १९ किलोमीटरवर आहे.

**नाशिकहून**–नारायणगावमार्गे जुन्नर. मुंबईहून अथवा पुण्याहून जायचे असले तरी गड एका दिवसात पाहून परतता येते.

****

सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

# खा.शरदचंद्र पवार साहेब बीड लोकसभेला देतील त्या उमेदवाराचा विजयी गुलाल उधळणारच–सुदामती गुट्टे

परळी वैजनाथ, (बातमीदार):– बीड जिल्हा हिंदुत्ववादी नाही तर नेहमी पुरोगामी विचारांना मानणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो.भाजप व पक्ष बळकावणा–याना फुटीरतावादी गटाला बीड जिल्ह्यातील जागृत मतदार निश्चित धडा शिकवुन खा.शरदचंद्रजी पवार साहेब बीड लोकसभेला देतील तो उमेदवाराचा विजयी गुलाल उधळणारच असे कार्यकर्तांना मार्गदर्शन करताना शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जे ष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात भाजप खासदारांनी एकही प्रकल्प उभारला नाही,रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी नेहमी दुसऱ्या जिल्ह्यावर अवलंबून राहावे लागते,शेतकऱ्यांना कुढलाच दिलासा दिला गेला नाही,आपण पाहतो रेल्वे प्रकल्प करण्यासाठी किती सार्वत्रिक निवडणुका झाल्या पोकळ आश्वासने भुलथापा देणा–या या भाजपा उमेदवाराला पराभुत करण्यासाठी आपण प्रत्येक मतदाराकडे गेले पाहिजे,केवळ पैसा आणि पैश्यातुन सत्ता मिळवणाऱ्या या भाजप व पक्ष बळकावणारे फुटीरतावादी गटाला बीड जिल्ह्यातील जागृत मतदार निश्चित धडा शिकवुन खा.शरदचंद्रजी पवार साहेब बीड लोकसभेला देतील तो उमेदवाराला प्रचंड मताधिक्याने निवडून देतील असा ठाम विश्वास सौ.गुट्टेंनी व्यक्त केला आहे.



आपण पाहत आहोत मोदी सरकारच्या हस्तक बनलेली ईडी हि संस्था भाजपाला विरोध करिल त्याला एक तर जेल अन्याथा पक्ष प्रवेश दिला जात आहे.अश्या भाजपाला या निवडणुकीत पायउतार करण्यासाठी मतदार सज्ज झाला आहे बीड लोकसभेची जागा महाआघाडीत शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला सुटली आहे.शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, कॉंग्रेस, आणि मित्र पक्षा सोबत घेऊन पुर्ण ताकत लावुन खा.शरदचंद्रजी पवार साहेबांच्या विचारांचा जो कोणी उमेदवार ठरेल त्या उमेदवारांच्या तुतारी चिंन्हावर मतदान करुन या भाजपाच्या जुलमी राजवटीला पराभूत करून शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगारांना न्याय देऊ या.खा.शरदचंद्रजी पवार साहेबांचे प्रुण लक्ष बीड लोकसभेवर केंद्रीत असुन लवकरच सक्षम असा उमेदवार जाहिर करतील त्या उमेदवाराला बीड जिल्ह्यातील सुजान मतदार निश्चित विजयी करतील असे शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी ठाम विश्वास यावेळी व्यक्त केला. ***

# ज्येष्ठ नेते फुलचंद कराड यांचा शरद पवार गटात प्रवेश

परळी वैजनाथ, (बातमीदार):– भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारणीवर अनेक वर्ष काम केलेले भगवान सेनेचे सरसेनापती यांनी आज मुंबईत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर फुलचंद कराड यांच्यासारख्या ज्येष्ठ भाजपा नेत्यांने शरद पवार गटात प्रवेश केल्याने हा बीड भाजपाला मोठा धक्का मानला जात आहे.

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समवेत निकटचे सहकारी म्हणून अनेक वर्ष फुलचंद कराड यांनी काम केलेले आहे. त्याचबरोबर भाजपाच्या विविध पदांवरही त्यांनी काम केलेले आहे. बीड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून तसेच वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन व संचालक म्हणून ते



कार्यरत राहिलेले आहेत. त्याचप्रमाणे यापूर्वीही त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केलेला होता. परळी मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून विधानसभेची निवडणूकही लढवली होती. त्यानंतर परत ते भाजपात आले होते. आता ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील , खा.नरेंद्रजी पाटील, आ.जितेंद्र आव्हाड , आ.राजेश टोपे आदी उपस्थित होते. **

# शक्य आहे तिथे नदी नांगरा !

सध्या उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. नदीतील वालुका , दगड–गोटे दिसत असतात. भूशास्त्र असे सांगते की नदीचा प्रवाह जमिनीच्या मऊ भागातून जात असतो व त्यामुळे ती खोल खोल होत असते व तिचे ऊंच किनारे तयार होतात. अनेक मोठया नद्या डाईक किंवा फॉल्ट झोनमधून वहात असतात. नदीच्या या पात्रात अनेक पावसाळ्यातील गाळ साचल्यामुळे पात्र जलाभेद्य होते व पावसाळ्यातील नदीत वाहणारे पाणी जेवढे भूगर्भात जायला हवे तेवढे जात नाही. त्यासाठी सामुदायिक ट्रॅक्टर चा उपयोग करून नदीची शक्य आहे तेवढी नांगरणी आवश्यक आहे ! हे समजून घेण्यासाठी ही खालील घटना वाचा.

नदी नांगरून जलस्तर आला ५०० फुटावरून ९० फुटावर....शहादा तालुख्यातील घटना ! दोन वर्षांपूर्वीची ही गोष्ट अवश्य वाचा व आपल्या गावाशही अंमलात आणा. शेत नांगरावे लागते ही गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे, पण नदी नांगरणे हे ऐकायला कसेसेच वाटते ना ? सतरा वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे, पण तिचे समकालीन मूल्य मात्र आजही तितकेच आहे. शहादा तालुक्यातील गोमाई या नदीच्या काठावरचे डांबरखेडा हे गाव . गोमाई मध्यप्रदेशातून वाहत सातपुड्याच्या डोंगररांगातून महाराष्ट्रातल्या प्रकाशा या गावी तापीला येऊन मिळते. संगमावर असल्याने प्रकाशा दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे. २००० ची गोष्ट आहे. डांबरखेडा परिसरात अचानक असे लक्षात आले की , परिसरातील बऱ्याच विहिरी , बोअरवेलना पाणी येत नव्हते. चारसहा महिने जिवंत असणाऱ्या गोमाई नदीच्या काठावर असून



देखील डांबरखेड्याच्या विहीरी , बोअर मृत . पाचशे ते सातशेफुटापर्यंत जलस्तर खोल गेला . लोक बोअरची खोली तेवढी वाढवत होते. पण पाणी वरती येत नव्हते .असे का ? शेतकरी हैराण. कुणाकडे नीट उत्तर नव्हते. मोतीलाल पाटील ( पटेल ) तात्या. नांदरखेडा त्यांचे गाव. शहाद्याला त्यांना डांबरखेड्यावरून जावे लागते . त्यामुळे डांबरखेड्याची पाणी समस्या मोतीलाल तात्यांच्याही चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाली होती. तात्या पुणे विद्यापीठाचे १९७० चे एम एस्सी ॲग्री . डांबरखेड्याची ही समस्या सार्वजनिक होती. गावात नदी असून विहरी , बोअर कोरड्या होत्या. सर्वचजण विचारात पडले होते , पण उत्तर सर्वांकडे नव्हते. तात्यांनी एकेदिवशी डांबरखेड गावाच्या सरपंचांना मनातल्या चार गोष्टी सांगितल्या . खूप दिवसानंतरच्या आपल्या चिंतनाचा परिपाक लोकांपुढे ठेवला. समस्येचा मुळापर्यंत जाऊनच उत्तर सापडतात. आणि ती चिरस्थायी असतात. जलस्तर खोल गेला या समस्येवर तात्यांनी सांगितलेला उपाय अगदीच वेगळा होता. काहीसा वेडेपणाचा , पण त्यामागे अभ्यास , संशोधन आणि चिंतन होते. लोकांनी तात्यांचे ऐकले आणि पाचशे ते सातशे फुटावर गेलेला जलस्तर चक्क नव्वद फुटावर आला. डांबरखेडच्या लोकांसाठी तात्यांनी स्वतः डिझल पुरवले , ट्रॅक्टर , लाकडी नांगर, लोखंडी नांगर अशा साधनांनी गोमाई नदी उन्हाळ्यात नांगरायला सुरुवात केली. लोखंडी फाळ वाकले. चार किमी. नदी आडवी नांगरायचा हा अजब प्रयोग काहीसा चेष्टेचा विषय झाला. गावकऱ्यांनी फक्त फक्त एक किलोमीटर इतकीच नदी नांगरली. जून कोरडा गेला , जुलैत पहिला पाऊसपूर आला . मात्र गोमाईचा हा पूर तापीला भेटायला गेला नाही. नांगरलेल्या नदीने रात्रीच सर्व पूरपाणी पिऊन टाकले . अवघ्या चोवीस तासात पाचशे फुटावरचे पाणी नव्वद फुटावर आले. लोक आनंदले. सकाळी परिसरातील मोटारींनी फोर्सने पाणी फेकले. तत्कालीन जिल्हाधिकारी असीमकुमार गुप्ता यांनी नदी नांगरण्याच्या या अभिनव प्रयोगाचे शिल्पकार म्हणून मोतीलाल तात्यांना '' वॉटर मॅन ऑफ शहादा '' असे संबोधून तात्यांचे तोंडभरून कौतुक केले होते .महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य सचिव अजित निंबाळकर यांनी मोतीलाल तात्यांच्या या जगावेगळ्या प्रयोगाची पाहणी करून कौतुक केले. नदी नांगरण्याची ही अभिनव कल्पना कशी सुचली ? या विषयी सांगताना तात्या बोलले , '' दरवर्षी येणाऱ्या गढूळ पूरपाण्यातले 'फाईन पार्टीकल' वाळूत साचून साचून दोन–तीन फुटावर हे पार्टीकल सेटल होतात , थरावर थर साचून त्याचे खडकीकरण होत जाते. अर्थातच पाणी खाली न झिरपता वाहून जाते. माझ्या अनेक वर्षांच्या अभ्यास आणि चिंतनातून मला समस्येचे हे कारण लक्षात आले. ''खेतीया या मध्यप्रदेशातील शहारापर्यंतच्या अनेक गावातील लोकांनी नंतर सातत्याने गोमाई नदी नांगरली आहे , आणि वाहून जाणारे पाणी आपल्याच गावात जिरवले आहे. हे तात्यांच्या कल्पक प्रयोगाचे फलित आहे. निराश न होता, आत्महत्येचा पर्याय न अवलंबता शेतकऱ्यांनी आपल्या समृद्धीचा जलस्तर जिवंत करण्यासाठी काय करता येईल याचा शोध घेतल्यास उत्तर नक्की सापडेल. मोतीलाल तात्या पटेल या वेड्या माणसासारखा परिपक्व विचार शेतकऱ्याने करावा बस. माझी सर्वांना विनंती आहे की हा प्रयोग प्रत्येक गावाने केला तर आपले गाव पण पाण्याच्या समस्येतून मुक्त होईल.*